दिनांक १६/०९/२०२०

# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी गणेश रामु बोर्डे वय ३३ वर्ष धंदा - शेती, रा. दरेगांव ता. खुलताबाद जिल्हा औरंगाबाद यांनी १०,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी नांव व पत्ता | :- | गणेश रामु बोर्डे वय ३३ वर्ष धंदा - शेती, रा. दरेगांव ता. खुलताबाद जिल्हा औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| घटनाचे ठिकाण | :- | पंचायत समिती कार्यालय समोर खुलताबाद |
| लाच स्विकारली रक्कम | :- | १०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या वडीलांचे शेतामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीराचा ठराव ग्रामसभेमध्ये मंजुर करुन घेऊन तसा अहवाल पंचायत समितीकडे पाठविणेसाठी |
| तपासी अधिकारी | | श्री. मारुती पंडीत, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्या वडीलांचे शेतामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीराचा ठराव ग्रामसभेमध्ये मंजुर करुन घेऊन तसा अहवाल पंचायत समिती खुलताबाद यांचेकडे पाठविणे साठी मौजे दरेंगाव ता.खुलताबाद जि. औरंगाबाद येथील महिला सरपंच यांचा पती गणेश रामु बोर्डे हे तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद कडे दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, मौजे दरेगांव ता.खुलताबाद जिल्हा औरंगाबाद येथील महिला सरपंच यांचा पती खाजगी इसम गणेश रामु बोर्डे यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन , तडजोडी अंती १०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक १६/०९/२०२० रोजी वर नमुद ठिकाणी सापळा लावण्यात आला असता, आरोपी गणेश रामु बोर्डे यांनी १०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.श्री.अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा.डॉ.अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री मारुती पंडीत यांनी केली आहे. त्यांना पोना/प्रकाश घुगरे, रविंद्र देशमुख, पोशि/ मिलींद इप्पर, कपील गाडेकर, चापोशि चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.